Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भारतातील ग्रामीण विकास व पंचवार्षिक योजनांचे मुल्यमापन

**अडेलकर धनंजय प्रकाश**

**प्रस्तावना:**

भारतीय समाजाचा सर्वांगिण अभ्यास करावयाचा असेल तर भारतीय ग्रामीण समाजाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. भारतीय ग्रामीण समाज १८ व्या शतकापर्यंत बलुतेदारी पद्धतीमुळे गावातील गरजा गावातच भागवल्या जात असत. १८ व्या शतकात घडून आलेली औद्योगिक क्रांती व ब्रिटिश शासन प्रणालीचा भारतीय समाजावर मोठा परिणाम झाला. औद्योगिकीकरण, नागरीकरणाचा परिपाक म्हणून स्थलांतर, कौटुंबिक विघटन या प्रक्रिया विकसित होऊ लागल्या. दळणवळण आणि शैक्षणिक प्रगती यांच्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना महत्त्वाच्या ठरू लागल्या. या पाश्र्वभूमीवर सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळवून देणे हे राज्यघटनेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने व्यक्तीचा वा पर्यायाने समाजातील सर्व घटकांचा सर्वांगिण विकास हे शासनाचे ध्येय असल्याने ग्रामीण विकास वा ग्रामीण पुनर्रचना हा महत्त्वाचा कार्यक्रम ठरला आहे. भारतातील ७० टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या अजूनही खेड्यांमध्ये वास्तव्य करते. देशाचा विकास हा खेड्यांच्या विकासावरच अवलंबून असल्याने स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांची यशस्विता ग्रामीण विकासावर अवलंबून असल्याचे स्पष्ट झाले.

**ग्रामीण विकासासाठी पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी:**

भारतामध्ये लोकशाही मार्गाने कल्याणकारी राज्याच्या निर्मितीचे ध्येय साध्य करण्यासाठी १९५१-५२ पासून पंचवार्षिक योजना राबविण्यात येत आहेत. दारिद्र्य निर्मूलन व लोकांना चांगले राहणीमान मिळवून देणे हा गेल्या अनेक पंचवार्षिक योजनांचा तसेच वार्षिक अर्थसंकल्पाचा मुख्य विषय होता व आजही आहे. दि. २ ऑक्टोबर १९५२ साली समाजविकास कार्यक्रम हाती घेण्यात आला, परंतु हा कार्यक्रम पुरेसा यशस्वी ठरला नाही. यानंतर ग्रामीण समाजातील दारिद्र्य निर्मूलनासाठी केंद्र शासनाने १९७६-७७ साली 'एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम' ही नविन योजना सुरु करण्याचे ठरविले. इ.स. १९७८-७९ पासून या सर्वसमावेशक नव्या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झाली.

भारतात दारिद्र्य निर्मूलन व एका आरोग्यपूर्ण, उत्पादनक्षम समाजाचा पाया मजबूत करण्यासाठी पाणी, स्वच्छता व आरोग्य शिक्षणाला पर्याय नाही. स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेता, इ.स.१९९९ पासून

यासदंर्भाने स्वतंत्र 'संपुर्ण स्वच्छता मोहिम' ही अभिनव योजना राबविली जाऊ लागली. या उपक्रमात लोकसहभागाला महत्त्व दिले गेले. ग्रामीण भागात रोजगाराच्या उपलब्धतेसाठी सन २००४ मध्ये 'राष्ट्रीय रोजगार हमी योजना' ही योजना सुरु करण्यात आली. ग्रामीण भारताचे पुन:निर्माण करण्यासाठी २००५-०६ पासून 'भारत निर्माण' योजना राबविण्यात येत आहे. तंटे बखेडे व वैयक्तिक शत्रुत्त्व हे ग्रामविकासात अडसर निर्माण करणारे घटक असल्याने १५ ऑगस्ट २००७ रोजी महाराष्ट्र शासनाने 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम' ही योजना सुरु केली. गावामध्ये तंटे होऊ नये याशिवाय तंटे झाल्यास त्याचा ग्रामपातळीवरच सामोपचाराने निपटारा व्हावा हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

भारतीय ग्रामीण समाजात होत असलेले परिवर्तन हे अपेक्षापेक्षा कमी वेगाने होत आहे. ग्रामीण भागात मुलभूत गरजेसंबंधीच्या अडी-अडचणी जोपर्यंत सोडविल्या जात नाही, तोपर्यंत ग्रामीण समाजाच्या विकासास गती येणार नाही. याशिवाय ग्रामीण समाजातील विविध संस्थांचा विकास हाही कळीचा मुद्दा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वात जास्त भर समाज विकासावर दिला गेला. त्यासाठी नियोजनाद्वारे विकास कार्यक्रम भारतात, विशेषत: ग्रामीण भागात राबविले गेले. कृषी, आरोग्य, शिक्षण, पशुसंवर्धन, सिंचन, दळणवळण इ. क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या हे खरे, पण त्याच बरोबर 'सर्व काही शासनानेच करावे' अशी परावलंबी मानसिकता जनतेत निर्माण झाली. शिवाय शासकीय यंत्रणेत खालपासून वरपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला तो वेगळाच! सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे सिद्धांत मांडले गेले. त्यातून पंचायती राज्य संस्थांना बळकट बनविले जात आहे. सक्षमीकरणाची संकल्पना केवळ व्याख्येच्या परिघातच थांबली नाही; तर अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गीय तसेच स्त्रियांसाठी आरक्षणाद्वारे ती संकल्पना साकार झाली.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामांमध्ये नियोजित पद्धतीने सामाजिक, आर्थिक व राजकीय विकास घडवून आणणे हे शासकीय व्यवस्थेचे उद्दिष्ट्य होते. स्वातंत्र्यानंतर पहिली पंचवार्षिक योजना अंमलात आली तेंव्हा समाजविकास कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. ग्रामीण जनतेत प्रगत दृष्टिकोन निर्माण करणे, सहकारी प्रयत्नांची सवय रुजविणे, उत्पादन वाढ मिळविणे, अधिक रोजगार निर्माण करणे व इतर अनुषंगिक उद्दीष्ट्य यामध्ये ठेवण्यात आली होती. एकाच वेळी विकास व कल्याण ही दोन्ही कार्ये या कार्यक्रमामार्फत हाती घेण्याचा सरकारचा हा प्रयत्न होता. समाजविकास कार्यक्रमाची यशस्विता शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या आर्थिक मदतीवर अवलंबून आहे. समाज विकासाच्या योजनांसाठी शासनाकडून पैसा उपलब्ध झाला तरच सरकारी कर्मचारी आणि ग्रामस्थ संयुक्तपणे कार्यक्रम यशस्वी करु शकतील.

मुख्यत: वीज, पाणी, रस्ते, आरोग्य, स्वच्छता, रोजगाराची हमी, ग्रामीण जनतेच्या राहणीमानाचा दर्जा, त्यांचे सामाजिक-आर्थिक प्रश्न इत्यादीच्या मुळाशी जाऊन आणि जनतेच्या समस्यांची शासनाच्या विविध योजनांची सांगड घालून योग्य दिशेने प्रयत्न केल्याशिवाय ग्रामीण समाजाचे चित्र बदलेल असे वाटत नाही.

**समारोप:**

भारतातील ग्रामीण विकासाचा आढावा लक्षात घेतला तर असे दिसते की, शासकीय पातळीवर आणि विविध प्रकल्पाच्या माध्यमातून ग्राम विकासासाठी जे अनेकविध प्रयत्न झाले ते मर्यादित स्वरुपामध्ये राहिले आहे याशिवाय दुसरे महत्त्वाचे म्हणजे खेड्यातील लोकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. ग्राम पातळीवर प्रश्न गावाच्या पातळीवरच सोडविणे आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामधून गावाचा विकास करणे हे अपेक्षित असले तरी शासन आणि जनता यांच्यामध्ये ताळमेळ न बसल्यामुळे ग्रामांचा अपेक्षित विकास होवू शकला नाही.

**संदर्भ:**

१. कुंभार नागोराव -संपादक (१९९०) : 'ग्रामीण विकास : समस्या व उपाय', प्रबोधन प्रकाशन, लातूर
२. गाडगीळ माधव, ८ ऑगस्ट २००९, 'विशेष लेख', दैनिक सकाळ, औरंगाबाद आवृत्ती, औरंगाबाद.
३. बापट ल.ग., अभ्यंकर ग.ल. (१९७९) : 'भारतीय आर्थिक विकास समस्या', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.
४. डोळे, ना.य. (१९९७) : 'उदारीकरण : नवे आर्थिक धोरण', विद्या प्रकाशन, नागपूर
५. हळबे, एस.के (१९६४) : 'समाज विकास आणि भारतीय ग्रामीण समाज', व्हीनस प्रकाशन, पुणे
६. शर्मा, वीरेन्द्र प्रकाश (१९९९) : 'ग्रामीण समाजशास्त्र', पंचशील प्रकाशन, जयपुर